MHRG190012062023

**::<u>विशेष दिवाणी दावा क्र.९५/२०२५ मधील निशाणी क्र.८१ वरील आदेश</u> ::**

प्रस्तुत अर्जाने प्रतिवादी क्र.०२ यांनी 'विना कैफियत' झालेला आदेश रद्द होऊन म्हणणे व कैफियत दाखल करण्यास संधी मिळणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व वादीने दिलेले म्हणणे वाचले. प्रतिवादी क्र.२ व वादीतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

०३. प्रतिवादी क्र.०२ चे कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांनी मुळ दाव्यास कैफियत दाखल केलेली आहे परंतु वादीने दाव्यात दुरुस्ती केलेल्या दाव्यास कैफियत दाखल करणेची होती. प्रतिवादी क्र.२ हे कामानिमित्त बाहेरगावी गेल्याने व आजारी असल्याने न्यायालयात नेमलेल्या तारखेस हजर राहु शकले नसल्यामुळे मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादीतर्फे अतिरिक्त कैफियत दाखल होणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. प्रतिवादीने जाणीवपुर्वक अथवा कोणत्याही गैरहेतुने सदर दाव्याचे कामी कैफियत दाखल करण्यास विलंब केलेला नाही. प्रतिवादीची कैफियत दाखल झाल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास सोयीचे व कायदेशीर होईल. प्रतिवादीचा अर्ज मंजुर केल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही उलट दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत

होईल. सबब, प्रतिवादी क्र.२ चा अर्ज मंजुर करुन दिनांक ०७.०४.२०२५ रोजी झालेला विनाकैफियत आदेश रद्द करुन प्रतिवादीस दुरुस्त दाव्यावर कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

०४. सदर अर्जास विरोध करताना वादीचे सदर अर्जास कोणतेही योग्य व सबळ कारण नसल्याने तसचे प्रतिवादीने कैफियत देण्यास जाणीवपुर्वक विलंब करुन दावा लांबणीवर टाकलेला असल्याने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे तसेच न्यायालय अर्ज मंजुर करण्याचे निष्कर्षापर्यत आल्यास वादीस खर्चाची रक्कम देण्याचे अटीवर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०५. उभय पक्षातर्फे करण्यात आलेल्या युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा दावा वादीने खरेदीखत रद्द ठरवुन मिळणेकरिता, ठरावाकरिता व निरंतर मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी दुरुस्त दाव्यास मुदतीत कैफियत दाखल केली नसल्यामुळे दिनांक ०७.०४.२०२५ रोजी विनाकैफियत आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र.२ यांनी कैफियत दाखल न करण्याबाबत दिलेली कारणे संयुक्तीक दिसून येतात. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.२ यांना बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. प्रतिवादी क्र.२ विरुध्द दिनांक ०७.०४.२०२५ रोजीचा झालेला विनाकैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होवून उभय पक्षातील वादाला पुर्णविराम मिळेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज कॉस्ट

रु.५००/– आकारुन मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

:: **<u>आदेश</u>** ::

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ विरुध्द दिनांक ०७.०४.२०२५ रोजी पारित झालेला दावा विनाकैफियत चालविण्याचा आदेश प्रतिवादी क्र.२ ने वादींना कॉस्ट रु.५००/– देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.२ यांनी विहित मुदतीत कैफियत अभिलेखावर सादर करावी

JADHAV HEMLATA RAVINDRA
Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.12 12:37:18 +0530

महाड
दिनांक १२.०९.२०२५

(**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड